महाराष्ट्र शासन
उपवनसंरक्षक,पुणे वन विभाग,पुणे
सेनापती बापट मार्ग,पुणे ४११ ००४

दूरध्वनी - ०२० २५६६ ०५९३ ई-मेल - dycfpune@gmail.com

क्रमांक:-अ/कक्ष-४-४/जमीन/ २१ /२०२२-२३ दिनांक:- २६ /०४/ २०२२

पत्र

प्रति,

मुख्य वनसंरक्षक,(प्रा)
पुणे.

विषय:- Diversion of 0.9921 ha. Forest Land for construction of Warehouse Building and Ancillary Structures under RKVY Scheme 2017-18 in village Shurshuphal, Tal.Baramati, Dist.Pune. **(FP/MH/Others/44963/2020)**

संदर्भ:- १) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,नागपूर यांचेकडील पत्र क्रं.कक्ष-१७/नोडल/पुणे/आयडी-१२९७६(२३)/११७२/२१-२२,दि.०८/१०/२०२१

२) मुख्य वनसंरक्षक,(प्रा.)पुणे यांचेकडील पत्र क्रं.ब/कक्ष-४/४(२)/जमीन/एफसीए-३३१/२०२१-२२/४४९, दि.१३/१०/२०२१.

३) या कार्यालयाचे पत्र क्रं.ब/कक्ष-४-२/जमीन/६४१/२०२०-२१,दि.१०.१२.२०२१.

४) Dy.General Manager,MSWC,Pune Region letter no.MSWC/RO/PR/77, Date – 11/01/2022.

५) या कार्यालयाचे पत्र क्रं.ब/कक्ष-४-२/जमीन/७७३/२०२१-२२,दि.१९.०१.२०२२.

६) Dy.General Manager,MSWC,Pune Region letter no.MSWC/RO/PR/124, Date – 19/01/2022.

७) उपमहाव्यवस्थापक,पुणे विभाग यांचेकडील पत्र क्रं.मरावम/विका/पुवि/जमीन/३५८,दि.०८.०३.२०२२.

८) उपमहाव्यवस्थापक,पुणे विभाग यांचेकडील पत्र क्रं.मरावम/विका/पुवि/जमीन/३६५,दि.११.०३.२०२२.

९) उपमहाव्यवस्थापक,पुणे विभाग यांचेकडील पत्र क्रं.मरावम/विका/पुवि/जमीन/५५५,दि.११.०४.२०२२.

१०) सहाय्यक वनसंरक्षक,(सांख्यिकी)पुणे यांचेकडील पत्र क्रं.स.व.सं(सांख्यिकी)/०८,दि.१९/०४/२०२२.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं.१ व २ अन्वये प्राप्त पत्राचे अनुषंगाने उपस्थित केलेल्या १ ते ८ त्रृटींचे संदर्भात प्रकल्प यंत्रणा यांना त्यांचेशी संबंधीत त्रृटींबाबतचा पुर्तता अहवाल सादर करणेबाबत उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं.३ अन्वये कळविण्यात आलेले होते.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं.४,५,६,७,८व ९ अन्वये प्रकल्प यंत्रणा यांचेकडून १ ते ८ मुद्दयाबाबतचा त्रृटी पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर केला आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे मुद्देनिहाय अहवाल सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | त्रृटी | पुर्तता अहवाल |
|---|---|---|
| १ | स्थळ निरीक्षण अहवालासोबत Geo Tagged Photos जोडलेले नाहीत. | स्थळ निरीक्षणवेळीचे Geo Tagged Photos ५ प्रतीत सोबत जोडून सादर करण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| २ | Violation Report वर मुख्य वनसंरक्षक पुणे यांची स्वाक्षरी केलेली नाही. | मुख्य वनसंरक्षक पुणे यांचे स्तरावरून पुर्तता होणेस विनंती. |
| ३ | Violation Report २९/०१/२०१८ च्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रकल्प यंत्रणेवर कार्यवाही करण्यात यावी. | प्रकल्प यंत्रणा यांनी उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं.९ अन्वये सादर केलेल्या त्रृटी पुर्तता अहवालामध्ये त्यांनी कळविले नुसार महामंडळाने मंडल अधिकारी,उंडवडी क.प.यांचेकडून ताबा घेतेवेळेस सदर जमीन ही सरकारी खाते मुलकी पड अशी होती. गा.ग.नं.७,७अ १२ यावर कोठेही सदर जमीन वनविभागाची असलेबाबत नोंद नव्हती. महामंडळाने ताबा घेतलेपासुन ते सन २०१८ साली महामंडळाने गोदामे बांधकाम चालू करेपर्यंत वन विभागाकडून कोणतीही हरकत घेण्यात आलेली नव्हती. सदर जमीन राखीव वन संवर्गातील असलेबाबत उल्लेख नव्हता. वनपरिक्षेत्र अधिकारी,बारामती यांनी दि.०४.०५.२०१९ च्या पत्रानुसार सदर जागा वनविभागाची असल्याचे सांगून सदर बांधकाम थाबविलेले आहे. त्यामुळे भारत सरकार पर्यावरण, वन व हवामान बदल नवी दिल्ली यांचे परिपत्रक दि.२९.०१.२०१८ मधील मुद्दा क्रं.E(In cases 'Forest Land' has been changed to 'non forest land' in government records: if the violation is not attributable to the user agency, no penalty shall be imposed.) नुसार महामंडळाने violation केलेबाबत दिसून येत नाही. तरी याबाबत योग्य तो निर्णय व्हावा, अशी विनंती केली आहे. **(सोबत संदर्भिय पत्राची छायांकित प्रत सलग्न)**<br>याबाबत उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं.१० अन्वये सहाय्यक वनसंरक्षक,(सांख्यिकी)पुणे यांनी त्यांचेकडील अहवालामध्ये मौजे शिर्सुफळ ता.बारामती, जि.पुणे येथील गट नं.७९२ चे महसूल अभिलेख ७/१२ सदरी वन संदर्भात नोंद सन २०१९ व अद्यापर्यंत असलेचे दिसून येत नाही. तसेच सन २०१९ पर्यंत महसूल विभागाचे ताब्यात असलेले सदरचे क्षेत्र २६.९८ हेक्टर पैकी २०.३७ हे. क्षेत्राचा ताबा वनविभागाने घेईपर्यंत सदरचे क्षेत्र वनक्षेत्र असल्याचे प्रकल्प यंत्रणा यांचे निदर्शनास आल्याचे दिसून येत नाही. सदर बाब शासकिय अभिलेखात असणाऱ्या तफावतीमुळे घडल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वरील संदर्भिय पत्र क्रं.९ अन्वये प्रकल्प यंत्रणा यांनी त्रृटी क्रं.३. Violation Report २९/०१/२०१८ च्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार, प्रकल्प यंत्रणेवर कार्यवाही करण्याचे अनुषंगाने सदर मार्गदर्शक सूचना मधील मुद्दा क्रं.E(In cases 'Forest Land' has been changed to 'non forest land' in government records: if the violation is not attributable to the user agency, no penalty shall be imposed.) नुसार कार्यवाही होणे उचित आहे अशी धारणा व्यक्त करून अहवाल पुढील योग्य त्या कार्यावाहिसाठी सादर करण्यात आला आहे. **(सोबत संदर्भिय पत्राची छायांकित प्रत सलग्न)** |

| | | |
|---|---|---|
| ४ | उप वनसंरक्षक व मुख्य वनसंरक्षक यांचे Violation बाबत Justification सादर करण्यात यावे. | उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं.९ अन्वये प्रकल्प यंत्रणा यांचेकडून सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार तसेच उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं.१० अन्वये सहाय्यक वनसंरक्षक,(सांख्यिकी)पुणे यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, मौजे शिर्सुफळ ता.बारामती, जि.पुणे येथील गट नं.७९२ चे महसूल अभिलेख ७/१२ सदरी वन संदर्भात नोंद सन २०१९ व अद्यापर्यंत असलेचे दिसून येत नाही. तसेच सन २०१९ पर्यंत महसूल विभागाचे ताब्यात असलेले सदरचे क्षेत्र क्षेत्र २६.९८ हेक्टर क्षेत्रापैकी २०.३७ हे. क्षेत्राचा ताबा वनविभागाने घेईपर्यंत सदरचे क्षेत्र वनक्षेत्र असल्याचे प्रकल्प यंत्रणा यांचे निदर्शनास आल्याचे दिसून येत नाही. सदर बाब शासकिय अभिलेखात असणाऱ्या तफावतीमुळे घडल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वरील संदर्भिय पत्र क्रं.९ अन्वये प्रकल्प यंत्रणा यांनी त्रृटी क्रं.३. Violation Report २९/०१/२०१८ च्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रकल्प यंत्रणेवर कार्यवाही करण्याचे अनुषंगाने सदर मार्गदर्शक सूचना मधील मुद्दा क्रं.E(In cases 'Forest Land' has been changed to 'non forest land' in government records: if the violation is not attributable to the user agency, no penalty shall be imposed.) नुसार कार्यवाही होणे उचित आहे अशी धारणा व्यक्त करून अहवाल पुढील योग्य त्या कार्यावाहिसाठी सादर करण्यात येत आहे.<br>तसेच उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं.८ अन्वये प्रकल्प यंत्रणा यांनी तत्कालीन उपव्यवस्थापक(अभियांत्रिकी), पुणे विभाग यांना गोदामाचे बांधकाम सुरू करतेवेळी अथवा सुरू असताना याबाबत आपणांस स्थानिकरित्या याची माहिती का प्राप्त होऊ शकली नाही? याचा खुलासा करणेबाबत नोटीस देण्यात आलेली असुन खुलासा मागविण्यात आलेला आहे. सदर पत्रासोबत Violation Report सह सदर नोटिस, संबंधिताचा खुलासा सादर केला आहे. **(सोबत संदर्भिय पत्र व पत्रासोबतचा Violation Report सह सदर नोटिस, संबंधिताचा खुलासा ५ प्रतीत. सलग्न )** |
| ५ | Online Part-I वर प्रस्तावित क्षेत्र ०.९९ हे. आहे, प्रस्तावाच्या एरीया स्टेटमेंटवर ०.९९२१ हे. आहे, दुरूस्ती करण्यात यावी. | उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं.७ अन्वये प्रकल्प यंत्रणा यांनी Online Part-I वर प्रस्तावित क्षेत्र ०.९९ हे. आहे त्याप्रमाणे हार्ड कॉपी मध्ये क्षेत्र ०.९९ हे. दुरूस्ती करून सादर केले आहे त्यानुसार त्रृटी पुर्तता ५ प्रतीत सादर करण्यात येत आहे. |
| ६ | सदरच्या प्रस्तावाची ऑनलाईन सद्यस्थिती मुख्य वनसंरक्षक यांचेकडे प्रलंबित आहे, या कार्यालयाकडे पाठविण्यात यावा. | मुख्य वनसंरक्षक पुणे यांचे स्तरावरून पुर्तता होणेस विनंती. |

| | | |
|---|---|---|
| ७ | Online Part-II व मुख्य वनसंरक्षक यांचे Online Part-III अपलोड करण्यात आलेले नाही. | Online Part-II अपलोड करण्यात आलेला असून त्याची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. |
| ८ | KML File Area Statement मध्ये Itemwise breakup नुसार दिसुन येत नाही. | प्रकल्प यंत्रणा यांनी KML File Area Statement मध्ये Itemwise breakup नुसार सादर केलेली असून ५ सीडी मध्ये सादर करण्यात येत आहे. |

वरीलप्रमाणे सादर करण्यात येत असलेल्या त्रृटी पुर्तता अहवाल पुढील योग्य ती कार्यवाहीकामी सादर करण्यात येत आहे हि विनंती.

सोबत - वरीलप्रमाणे.

(राहुल पाटील,भा.व.से.)
उपवनसंरक्षक,
पुणे वनविभाग,पुणे.

प्रत :- Regional Manager, Maharashtra State Warehousing Corporation , Pune Region,Pune . E-mail-pune.ro@mswc Mb.No.7507138234 यांचेकडे वरीलप्रमाणे माहितीसाठी अग्रेषित.

प्रत :- सहा.वनसंरक्षक (सांख्यिकी) पुणे यांचेकडे वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी.

प्रत :-वनपरिक्षेत्र अधिकारी,बारामती यांना वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी.